# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ४४-२२** **दिनांक १०/०२/२०२२**

## "अंमली पदार्थाची तस्करी करणा-या टोळी विरोधात गुन्हे शाखा कक्ष-3 ची कारवाई ५० किलो गांजा जप्त"

मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवुन दिनांक १०/०२/२०२२ रोजी ००.४५ वाजता वसई पुर्व, मुंबई अहमदाबाद महामार्गावर गुजरात बाजुकडून मुंबईच्या दिशेने चिंचोटी ओव्हरब्रिज रिक्षा क्रमांक एम.एच.४८ बी.एफ. ५३३४ मधुन आरोपीत नामे - १) अजय वाघे वय २७ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) जय पाटील वय २४ वर्षे, रा. दहिसर पुर्व, मुंबई. व एक महिला आरोपीत वय ४० वर्षे, रा. दहिसर पुर्व, मुंबई. यांचे कब्जातून उग्रवासाचा काळपट रंगाचा कॅनबीस या वनस्पतीचे शेंडे म्हणजेच गांजा नावाचा एकुण ५०.२० किलोग्राम वजनाचा ११,४४,०००/- रु किंमतीचा अंमली पदार्थ तस्करी करीत असतांना मिळुन आला आहे.

सदर आरोपीत विरुध्द वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १६०/२०२२ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २२(क), २५, २९ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे.

वरील कामगिरी पोलीस उप आयुक्त डॉ. श्री.महेश पाटील (गुन्हे), सहा.पोलीस आयुक्त श्री. अमोल मांडवे (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, शंकर शिंदे,सचिन घेरे, पो.शि./ राकेश पवार, अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.